## मलेरिया म्हणजे काय?

मलेरिया हा आजार परोपजीवीमुळे होतो. सर्वसाधारणपणे डासांच्या चाव्यामुळे त्याचा प्रसार होतो. तसेच दूषित रक्त जे रक्तसंक्रमणाद्वारे दिले जाते.

## मलेरियाचा धोका कशामुळे वाढतो?

ज्या प्रभागात मलेरियाचा प्रसार झालेला आहे अशा प्रभागातील निरोगी माणसे फिरतात किंवा राहतात अशा व्यक्तींची प्रतिकार शक्ती कमी असल्यास, महिला गर्भवती असल्यास लहान बालके आणि मुले आणि एचआयव्ही बाधित व्यक्ती यांना मलेरियाचा प्रादुर्भाव होण्याचा संभव असतो.

## मलेरियाची चिन्हे आणि लक्षणे काय आहेत?

- ताप
- हूडहुडी
- घाम सुटणे
- डोके व स्नायू दुखणे
- मळमळ आणि उलटया
- पोट दुखणे आणि अतिसार

## मलेरियाचे निदान कसे करतात?

मलेरियाचे निदान मलेरियाच्या जंतुच्या रक्तातील आढळावरुन केले जाते. या रक्त तपासणीत सौम्य पंडुरोग रक्तबिंबिंकांच्या संख्येत सौम्य घट (थंब्रोसायटोपेनिया) बिलुरुबिनचे प्रमाण वाढणे, रक्तात विकरांच्या प्रमाणात वाढ होणे.

## मलेरियावर उपचार कसे करतात?

**मलेरियावरील औषधोपचार** - संसर्ग करणा-या परजीवींना नष्ट करण्यासाठी औषधे दिली जातात. परजीवीच्या प्रकारानुसार औषधे दिली जातात.

**ॲसिटोमिनोफेन-** या औषधांमुळे वेदना व ताप कमी होतो हे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय उपलब्ध होते ते केंव्हा व किती प्रमाणात घ्यावे याची माहिती घ्या.योग्य पध्दतीने व योग्य प्रमाणात न घेतल्यास ॲसिटोमिनोफेनमुळे यकृतास हानी होऊ शकते.

नॉन स्टेरॉईड ॲन्टी इन्फ्लेमेटरी ड्रग्ज (NSAID) आयबुप्रोफिनमुळे घाम, वेदना, व ताप कमी होतो ते डॉक्टरी सल्ल्याशिवाय उपलब्ध आहे NSAID मुळे काही व्यक्तींना पोटात रक्तस्त्राव किंवा मूत्रपिंडाचे विकार होऊ शकतात. रक्त पातळ करणारी औषधे घेत असल्यास NSAID घेण्यापूर्वी तो सुरक्षित आहे किंवा याविषयी खात्री करुन घ्यावी लेबलवर लिहिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. सहा महिन्यांपेक्षा कमी वयाच्या मुलांना आरोग्य सेवा देणाऱ्या योग्य व्यक्तींच्या सल्ल्याशिवाय देऊ नये.

## मलेरियापासून प्रतिबंध कसा करावा?

- कपडे व शरीरावर तसेच ब्लँकेटसारख्या कपडयांवर जंतूरोधक औषध फवारावे.
- शरीर झाकून घ्यावे - पूर्ण हाताचे शर्ट, पॅन्ट घालावी. रात्रीच्या वेळी बाहेर जाऊ नये
- मच्छरदाणीत झोपावे- डास रोधक फवारा मच्छरदाणीवर फवारावे. मच्छरदाणीला कुठेही भोके पडली नाहीत याची खातरजमा करुन घ्यावी
- घरांचे संरक्षण करावे- घराच्या दारे खिडक्यांना जाळया लावाव्या. घरात जंतूनाशकाची फवारणी करुन डासांचा नायनाट करावा.
- घराभोवतालचे साठलेले पाणी - साचलेल्या पाण्यात डास अंडी घालतात आणि वाढतात. त्यामुळे घराभोवती पाणी साचू देऊ नये.




**संदर्भ:** मायक्रोमेडेक्स केर नोट्स सिस्टम ऑनलाईन 2.0